# धर्मप्रांतीय उपासना आयोग, वसई

## पुनरूत्थान तिसरा रविवार – १४ एप्रिल २०२४

## श्रद्धावंतांच्या प्रार्थना

धर्मगुरू ः माझ्या बंधू भगिनींनो, ख्रिस्ताच्या पुनरूत्थानाच्या आनंदासह आपण आपल्या परमेश्वर पित्याकडे प्रार्थना करू या. त्याच्या अतिप्रिय पुत्राच्या प्रार्थना त्याने ऐकल्या आणि स्वीकारल्या तो आपल्या मागण्या पूर्ण करील असा विश्वास बाळगू या.

प्रतिसाद ः प्रभो, आमची प्रार्थना ऐक.

१. आपले पोप फान्सिस, आर्चबिशप फेलिक्स, धर्मगुरू व व्रतस्थ ह्यांना पुनरूत्थित ख्रिस्ताची शांती सर्व जगभर पसरविण्यासाठी पवित्र आत्म्याची कृपा व चांगल्या आरोग्याची देणगी लाभावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

२. आपले राज्यकर्ते व अधिकारी ह्यांना त्यांची कर्तव्ये निःस्वार्थीपणे व जबाबदारीने पूर्ण करण्यास पुनरूत्थित ख्रिस्ताची प्रेरणा व आपल्या सर्वांकडून सहकार्य लाभावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

३. भयभीत झालेल्या शिष्यांना येशूने वारंवार दर्शन दिले व त्यांच्या विश्वासात वाढ झाली व ते ख्रिस्ताचे जगातील साक्षीदार बनले. येशूचे साक्षीदार बनण्यास आम्हास पवित्र आत्म्याचे सामर्थ्य मिळावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

४. ख्रिस्ताच्या पुनरूत्थानाद्वारे आपल्याला नवजीवनाचा मार्ग दिसावा, आपल्या शब्द व कृतीद्वारे ख्रिस्त प्रतिबिंबीत व्हावा व जे आपण स्वतः अनुभवतो त्याची साक्ष प्रखरपणे आपल्याला जगाला देता यावी म्हणून आपण प्रार्थना करू या.

५. आपल्या धर्मग्रामातील सर्व बालकांवर, आजारी लोकांवर, जेष्ठ नागरिकांवर व जे परगावी परदेशात आहेत अशावर पुनरूत्थित ख्रिस्ताचा आशीर्वाद असावा तसेच सर्व प्रकारच्या नैसर्गिक आपत्ती पासून आपले रक्षण व्हावे म्हणून आपण प्रार्थना करू या.

थोडा वेळ शांत राहून आपण आपल्या वैयक्तिक गरजांसाठी प्रार्थना करू या.

धर्मगुरू ः हे स्वर्गीय पित्या, तुझ्या लोकांच्या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणा-या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.